# मेट्रोच्या बीकेसी ते आरे टप्प्यासाठी जोरदार प्रयत्न

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

कुलाबा - वांद्रे-सिप्झ मेट्रो ३ प्रकल्पातील आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा यावर्षी सुरू करण्याचा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनचा निर्धार आहे. या टप्प्याचे काम ८५.२ टक्के पूर्ण झाले आहे. मेट्रो-३ या प्रकल्पाचे एकूण काम ७९.८ टक्के पूर्ण झाले आहे.

या मार्गाची दोन टप्प्यात विभागणी करण्यात आली आहे. पहिला टप्पा आरे ते बीकेसी असा आहे. तर दूसरा टप्पा बीकेसी ते कफ परेड असा आहे. बीकेसी ते कफ परेड हा दूसरा टप्पा या वर्षी सुरू होण्याची शक्यता कमी आहे. या टप्प्यातील ७६ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. कारडेपो हा या प्रकल्पातील महत्वाचा भाग आहे. कारडपोसाठी आरेच्या जागेवरच शिक्कामोर्तब झाल्यापासून कारडेपोचे काम वेगाने सुरू आहे. कारडेपोचे ५३ टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे.

हा मार्ग पूर्णपणे भूमिगत आहे. त्यासाठी बोगदे खोदण्याची कामे १०० टक्के पूर्ण झाली आहेत. ही कामे पूर्ण झाल्यामुळे स्थानक उभारणीच्या कामाला गती मिळाली आहे.

आरे ते बीकेसी या पहिल्या टप्प्याचे काम लवकर पूर्ण होणार असल्याने हा टप्पा वाहतुकीसाठी सुरू करण्यात येईल. त्यासाठी ट्रेनही मुंबईत आल्या असून सर्व ट्रेनची चचणी यशस्वी झाली आहे.